आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. एच ओ/ ६५१२
दिनांक :- ३०/९/२०२५

-: कार्यालयीन परिपत्रक :-

विषय :-"स्वस्थ नारी सशक्त परिवार" अभियानादरम्यान आयोजित शिबिरास उपस्थित रहाणेबाबत.

मे.केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दि.१७/०९/२०२५ ते दि.०२/१०/२०२५ या कालावधीमध्ये दररोज सकाळी १०:०० ते दुपारी ४:०० या वेळेत पुणे महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालय, युपीएचसी,आयुष्मान आरोग्य मंदिर,हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे "स्वस्थ नारी,सशक्त परिवार" अभियान राबविणेत येत आहे.

सदर अभियानांतर्गत **दि.०१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०:३० ते ५:०० या वेळेत श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह (जुना जी.बी. हॉल) तिसरा मजला, पुणे महानगरपालिका** येथे खालीलप्रमाणे विविध आरोग्य विषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

विषय व वेळ
● "आरोग्यम धनसंपदा" Health Holistic Approch अंतर्गत महिलांसाठी शारीरिक, मानसिक आरोग्य व आहार विषयक जनजागृती व मार्गदर्शनपर व्याख्याने **१. मा.तात्यासाहेब फडतरे(मिलेट तज्ञ):- भरड धान्य चे आहारातील महत्व** **२. डॉ. वैशाली गोमसाळे(आहार तज्ञ):- संतुलित आहार व पोषण** **३. डॉ.निना बोराडे(आरोग्य अधिकारी):- समृद्ध मानसिक आरोग्य हीच यशाची गुरुकिल्ली** **वेळ: सकाळी १०.३० ते १२.३०**
● सर्वांसाठी रक्तदान शिबिर (विशेष सहकार्य जनसेवा ब्लड सेंटर) **वेळ: सकाळी ११.०० ते ५.००**
● महिलांची आरोग्य तपासणी (असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, हिमोग्लोबिन तपासणी) **वेळ: दुपारी१२.३० ते ५.००**

तरी उपरोक्त आरोग्य उपक्रमांसाठी पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारत व सर्व क्षेत्रिय कार्यालयाकडील अधिकारी व कर्मचारी यांनी दि.०१ ऑक्टोबर २०२५ रोजी उपरोक्त नमुद वेळेत उपस्थित रहाणेस विनंती आहे.

मा.स.कळावे.

(डॉ.निना बोराडे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

प्रत :-
१.मा.महापालिका आयुक्त,पुणे महानगरपालिका
२.मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/ई/वि),पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहितीस्तव...

प्रत :-
१.मा.सर्व खातेप्रमुख/मा.उप आयुक्त/विभागप्रमुख,पुणे महानगरपालिका
यांजकडेस आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी...